माहिती हवीय?

शिल्पा दांडेकर, रायगड.

□ मनिषा कोईरालाने कोणत्या चित्रपटापासून चित्रपटात पदार्पण केलं? तिचा पहिला नायक कोण होता? दिग्दर्शक कोण? तिला कोणत्या चित्रपटासाठी पुरस्कार मिळाले? मनिषाने हिंदी व्यतिरिक्त कोणत्या प्रांतीय चित्रपटांत अभिनय केला?

— मनीषाचा पहिला चित्रपट *सौदागर*. नायक विवेक मुशरन, दिग्दर्शक सुभाष घई, फिल्मफेअर पारितोषिकात *१९४२-ए लव्ह स्टोरी*, *अकेले हम अकेले तुम*, *खामोशी-द-म्युझिकल*साठी तिचं नामांकन झालं होतं पण नामांकनापुढे ती कधी गेली नाही.

अनिता राणे, रत्नागिरी.

□ देव आनंद याचे हीट चित्रपट कोणकोणते होते? त्याच्या पहिल्या चित्रपटाची नायिका कोण होती? नायक म्हणून अखेरच्या चित्रपटाची नायिका कोण होती? देव आनंदने कोणत्या चित्रपटांत चरित्र भूमिका केल्या?

— *जिद्दी*, *बाजी*, *सजा*, *जाल*, *पतिता*, *मकान नं. ४४*, *टॅक्सी ड्रायव्हर*, *इन्सानियत*, *मुनीमजी*, *सी.आय.डी.*, *बारीश*, *दुश्मन*, *नौ दो ग्यारह*, *पेईंग गेस्ट*, *अमरदीप*, *कालापानी*, *सोलवा साल*, *लव्ह मॅरेज*, *जब प्यार किसीसे होता है*, *हम दोनो*, *असली नकली*, *बात एक रात की*, *गाईड*, *ज्वेल थीफ*, *हरे रामा हरे कृष्णा*, *अमीर गरीब*, *जॉनी मेरा नाम*, *बनारसी बाबू*, *जानेमन*, *देस परदेस*, *वारंट* हे देव आनंदचे हीट चित्रपट. *हम एक है* त्याचा पहिला चित्रपट. या चित्रपटात कमला कोटणीस त्याची नायिका होती. *मनपसंद* त्याने नायकाची भूमिका केलेला शेवटचा चित्रपट. नायिका टीना मुनीम. *आनंद और आनंद* त्याने चरित्र भूमिका केलेला पहिला चित्रपट. त्यानंतर *स्वामीदादा*, *लष्कर*, *सच्चे का बोलबाला*, *अव्वल नंबर*, *रिटर्न ऑफ ज्वेलथीफ*, *मैं सोलह बरसकी* या चित्रपटात तो चरित्र भूमिकेत चमकला.

रविकांत साखरे, जामखेड.

□ *वैशाख वणवा*, *हा खेळ सावल्यांचा*, *मधुचंद्र*, *बन्याबापू*, *कलंक शोभा*, *घरकुल*, *पडछाया* या चित्रपटातील नायक-नायिका संगीतकार, गीतकार कोण?

— *वैशाख वणवा*: नायक-नायिका रमेश देव-जयश्री गडकर, संगीतकार दत्ता डावजेकर, गीतकार ग.दि. माडगूळकर. *हा खेळ सावल्यांचा*: नायक-नायिका, डॉ.काशिनाथ घाणेकर-आशा काळे, संगीतकार-हृदयनाथ मंगेशकर, गीतकार सुधीर मोघे. *मधुचंद्र*: नायक-नायिका, डॉ.काशिनाथ घाणेकर-उमा, संगीतकार एन.दत्ता, गीतकार ग.दि. माडगूळकर. *बन्याबापू*: नायक-नायिका निळू फुले-सरला येवलेकर, संगीतकार ऋषीराज, गीतकार मुरलीधर गोडे. *कलंकशोभा*: नायक-नायिका सूर्यकांत-जयश्री गडकर, संगीतकार सुधीर फडके, गीतकार मधुसूदन कालेलकर. *घरकुल*: नायक-नायिका अरुण सरनाईक-जयश्री गडकर, संगीतकार सी.रामचंद्र, गीतकार ग.दि. माडगूळकर, सुरेश भट, शांता शेळके. *पडछाया*: नायक-नायिका डॉ. काशिनाथ घाणेकर-रत्ना, संगीतकार दत्ता डावजेकर, गीतकार ग.दि.माडगूळकर.

संतोष हिंगुराव, पेण.

□ सुलक्षणा आणि विजयता पंडित या दोघी बहिणींची कौटुंबिक पार्श्वभूमी चित्रपट क्षेत्राशी संबंधित आहे काय? त्या दोघींचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?



लव्ह स्टोरीमध्ये विजयता पंडित - कुमार गौरव

— सुलक्षणा व विजयता यांची पार्श्वभूमी चित्रपटाची नाही. तर गायकीची आहे. त्या दोघींचे आजोबा ज्योतिराम मोतीराम आणि वडील प्रताप नारायण अभिजात गायक होते. सुलक्षणाचा पहिला चित्रपट *संकल्प*. या चित्रपटात नायक होता महेश. विजयताचा पहिला चित्रपट *लव्ह स्टोरी*, नायक कुमार गौरव.

□ अमरीश पुरीना कोणकोणत्या चित्रपटासाठी ॲवॉर्ड मिळालाय?

— *मेरी जंग* (१९८६), *विरासत* (१९९८) साठी त्यांना सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेत्याचं फिल्मफेअर पारितोषिक मिळालंय.

□ गीता दत्तने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केलीय?

— एकाही चित्रपटात नाही.

संतोष हालकुडे, कुर्डूवाडी.

□ एका संगीतकाराने अर्धवट ठेवलेला चित्रपट दुसऱ्या संगीतकाराने पूर्ण केलाय असं कधी झालंय का?

— अनेकदा झालंय. *शबिस्तान* हा चित्रपट सी.रामचंद्रनी अर्धवट सोडून दिला होता. त्यानंतर मदनमोहनने तो पूर्ण केला. *गर्ल्स स्कूल* हा चित्रपट अनिल विश्वासनी अर्धवट सोडला होता. त्यानंतर सी. रामचंद्रनी तो पूर्ण केला. *हलचल* हा चित्रपट सज्जादनी अर्धवट सोडला होता. नंतर तो महंमद रफीनी पूर्ण केला. *मेहबूबा* हा चित्रपट रोशननी अर्धवट सोडला होता. नंतर तो ओ.पी.नय्यरनी पूर्ण केला. *बाप रे बाप* सी. रामचंद्रनी अर्धवट सोडला होता. तो नंतर ओ.पी. नय्यरनी पूर्ण केला. *अनारकली* वसंत प्रकाशनी एका गाण्यानंतर सोडून दिला होता. नंतर तो सी. रामचंद्रनी पूर्ण केला. अशी अनेक उदाहरणे आहेत.

संतोष हिंगुराव, पेण.

□ मीनाकुमारीने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली? तिला किती अपत्य होती?

— *बच्चो का खेल*, *पिया घर आजा*, *श्री गणेश महिमा*, *हनुमान पाताळ विजय*, *हमारा घर*, *लक्ष्मी-नारायण*, *अल्लादिन और जादूई चिराग*, *मदहोश*, *तमाशा*, *बैजू बावरा*, *नौलोखा हार*, *दायरा*, *दानापानी*, *परिणीता*, *चांदणी चौक*, *इल्जाम*, *अदले जहाँगीर*, *बंदिश*, *रुक्साना*, *बंधन*, *एक ही रास्ता*, *हलाकू*, *मेरे माहिब*, *नया अंदाज*, *शतरंज*, *मिस मेरी*, *शारदा*, *सवेरा*, *सहारा*, *अर्धांगिनी*, *चांद*, *चार दिल चार राहे*, *जागीर*, *चिराग कहाँ रोशनी कहाँ*, *मधू*, *सट्टा बाजार*, *शरारत*, *बहाना*, *कोहिनूर*, *भाभी की चूडियाँ*, *प्यार का सागर*, *जिंदगी और ख्वाब*, *आरती*, *मैं चुप रहूंगी*, *साहिब बीवी और गुलाम*, *अकेली मत जईयो*, *किनारे किनारे*, *दिल एक मंदिर*, *बेनजीर*, *मैं भी लडकी हूं*, *सांज और सबेरा*, *भीगी रात*, *काजल*, *पूर्णिमा*, *फूल और पत्थर*, *चित्रलेखा*, *पिंजरे के पंछी*, *बहूबेगम*, *नूरजहाँ*, *चंदन का पलना*, *अभिलाषा*, *दुश्मन*, *मेरे अपने*, *पाकिजा*, *गोमती के किनारे*, *सात फेरे* या चित्रपटात मीनाकुमारीने नायिकेची भूमिका केली, तिला अपत्य नव्हतं.